# प्रेसनोट

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे
दि. १२/०७/२०१८

## ट्रेझरी शाखा पुणे येथील लेखा लिपीकास एक हजार रूपयांची लाच स्विकारताना रंगेहात पकडले.

---

यातील तक्रारदार हे शासकीय कर्मचारी असून तक्रारदार यांच्या वेतनवाढीच्या फरकाचे मंजूर बिल मिळणेकरीता तक्रारदार लोकसेवक राहूल दुधेकर, लेखालिपीक ट्रेझरी शाखा पुणे याने तक्रारदार यांचेकडे १,०००/- रूपये लाचेची मागणी केली होती. सदर बाबत तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे कार्यालयामध्ये तक्रार नोंदविली.

सदर तक्रारीची दिनांक १२/०७/२०१८ रोजी पडताळणी केली असता लोकसेवक राहुल दुधेकर लेखालिपीक, ट्रेझरी शाखा पुणे याने तक्रारदार यांच्या वेतनवाढीच्या फरकाचे मंजूर बिल मिळणेकरीता तक्रारदार यांच्याकडे १,०००/- रूपये लाचेची मागणी करून १,०००/- रूपये स्विकारले.

त्यावरुन आज दिनांक १२/०७/२०१८ रोजी सापळा कारवाई केली असता सापळा कारवाईमध्ये लोकसेवक राहूल देविदास दुधेकर वय-४०, नोकरी - लेखालिपीक, ट्रेझरी शाखा पुणे याने तक्रारदार यांचेकडून ट्रेझरी कार्यालय, पुणे येथे १,०००/- रूपयांची लाचेची रक्कम स्विकारल्यावर त्यास रंगेहात पकडण्यात आले असुन त्याचेवर बंडगार्डन पोलीस ठाणे, पुणे शहर येथे लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

सदरची कारवाई हि मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. संदीप दिवाण यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकावर सपर्क साधण्याबाबतचे आवाहन श्री. संदीप दिवाण, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे-
   दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी- पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. फेसबुकपेज- **www.facebook.com-maharashtraACB**
७. वेबसाईट- **www.acbmaharashtra.gov.in**
८. **Mobile App - www.acbmaharashtra.net**

( सुहास नाडगौडा )
सहा.पोलीस आयुक्त/पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.